**न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, सांगोला यांचे न्यायालयात**
**किरकोळ फौजदारी अर्ज क्र. ४४०/२०२३**
**निशाणी १२ लगत आदेश**
(पुजा व इतर विरुध्द बाळासाहेब व इतर.)

प्रस्तुतचा अर्ज सामनेवाले यांनी त्यांचे विरुध्द पारीत झालेला विना म्हणणे चौकशी आदेश रद्द होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. सामनेवाले यांनी असे कथन केले आहे की, प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी सामनेवाले विरुध्द कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम १२ नुसार दाखल केला आहे. सामनेवाले सदर प्रकरणात हजर झाले आहेत, परंतु त्यांनी त्यांचे म्हणणे दिलेले नाही. सामनेवाला क्र. २ व ३ हे वयोवृध्द आहेत. सामनेवाला क्र. १ हा मजुरीसाठी बाहेरगावी गेलेला होता. सामनेवाला क्र. ३ ते ६ हे सामनेवाला क्र. १ ते ३ पासून विभक्त राहातात. त्यामुळे त्यांना मुदतीत म्हणणे देता आले नाही. त्यामुळे त्यांचे विरुध्द विना म्हणणे आदेश पारीत झाला आहे. सदरचा आदेश रद्द होणे आवश्यक आहे. तरी सामनेवाले यांचे विरुध्द पारीत झालेला विना म्हणणे चौकशी आदेश रद्द करणेत यावा अशी विनंती केली आहे.

३. अर्जदारतर्फे अर्जावरती म्हणणे देण्यात आले असून त्यांनी असे कथन केले की, सामनेवाले यांचा अर्ज खरा व कायदेशीर नाही. अर्ज नामंजूर करणेत यावा. अर्ज मंजूर करावयाचा झालेस खर्च देण्याबाबत आदेश व्हावेत, अशी विनंती केली आहे.

०४. पुढील मुद्दे माझे विचारार्थ उपस्थित होतात. त्यांचेवरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह नोंदवत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रस्तुतचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे काय ? | होकारार्थी |
| २. | आदेश काय ? | अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |

## कारणमीमांसा

**मुद्दा क्र. १ बाबत** –

०५. प्रस्तुतचा अर्ज, अर्जदार व सामनेवाले यांचे वकीलांचे म्हणणे व दोन्ही पक्षातर्फे युक्तिवाद ऐकला. सामनेवाले यांनी त्यांच्या विरुध्द झालेला विना म्हणणेचा आदेश रद्द करुन मागितला आहे. अर्जदारचे वकीलांनी म्हणणे दाखल करुन आक्षेप असल्याचे नमुद केले आहे.

०६. सामनेवालेतर्फे अर्जात नमुद केलेली कारण संयुक्तिक वाटत असल्या कारणाने तसेच नैसर्गिक न्यायाच्या तत्वानुसार दोन्ही पक्षकारांना त्यांची बाजू मांडण्याची पुरेपुर संधी देण्यात यावी. जर सामनेवाले त्याच्या लेखी म्हणण्याशिवाय प्रकरण चालले तर त्याच्या हक्कास बाधा पोहचू शकते. याउलट सामनेवाले यांना लेखी म्हणणे दाखल करण्याची संधी दिली तर अर्जदारचे अतोनात नुकसान होणार नाही. म्हणून सामनेवाले

यांचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. करीता मी मुद्दा क्र. १ यास होकारार्थी उत्तर नोंदवित आहे.

**मुद्दा क्र २ करीता –**

०७. मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी नोंदविल्याने सामनेवाले यांचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. करीता मुद्दा क्र. २ च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. सामनेवाले यांचा अर्ज प्रत्येकी रु. ५०/– दंड अर्जदारास देण्याचे अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. सामनेवाले यांनी खर्चाची रक्कम अर्जदारास दिलेस त्यांचे विरुध्द पारीत झालेला विना म्हणणे चौकशी आदेश रद्द करण्यात येतो व सामनेवाले यांना म्हणणे मांडण्याची परवानगी देण्यात येते.

सांगोला.
दिनांक – ०३/०६/२०२४.

(श्री. संजय मो. घुगे)
न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग,
सांगोला.